वाचले :

१. मा.आयुक्त यांचेकडील दि.१६/१२/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८, सामान्य प्रशासन विभाग,
क्र.सा.प्र.वि/२/कावि/८२७/२०२४
दिनांक : १६ /१२/२०२४

विषय – दाखल फौजदारी गुन्ह्यांकरीता तपास यंत्रणेस/पोलिस यंत्रणेस महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचारी यांची पंच म्हणून नियुक्ती करणेकामी विभागप्रमुखांना प्राधिकृत करणे बाबत...

आदेश,

लाचलुचपत व फौजदारी प्रकरणांमध्ये शासकीय पंच उपलब्ध करून देण्याबाबत भारतीय दंड प्रक्रिया संहिता (Criminal Procedure Code, 1973) व भारतीय पुरावा अधिनियम (Indian Evidence Act, 1872) यामध्ये काही महत्त्वाच्या तरतुदी आहेत. पंचनामा तयार करण्यासाठी पंचांची उपस्थिती आवश्यक असते, जे साक्षीदार म्हणून काम करतात.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रांतर्गत येणारे पोलिस कार्यालयांमार्फत पंच उपलब्ध करुन देण्याकामी महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे मागणी केली जाते. प्रकरणाचे गांभीर्य विचारात घेवून सामान्य प्रशासन विभागामार्फत पंच नियुक्ती बाबतचे आदेश दिल्यानंतर पंच म्हणून नियुक्त केलेले कर्मचारी काही अपावादात्मक कारणांस्तव कर्तव्यावर अनुपस्थित असल्याचे निदर्शनास येते, परिणामी गुन्ह्यातील कामकाजामध्ये अडथळा निर्माण होवून विलंब होतो. तसेच प्रशासकीय कामकाज शीघ्रतेने व कार्यक्षमतेने पार पाडले जात नाही.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रांतर्गत येणा-या पोलीस स्टेशन मार्फत पंच उपलब्ध करुन देण्याकामी संबंधित क्षेत्रीय कार्यालयांकडे मागणी केली जाते मात्र पंच नियुक्ती बाबत अधिकार नसल्याचे संबंधित विभागप्रमुखांकडून सबब देवून पोलिस प्रशासनास सहकार्य करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

पंचनामा करण्यासाठी स्वतंत्र व विश्वासार्ह व्यक्तींची नियुक्ती करावी याबाबत शासना मार्फत शासकीय तसेच निमशासकीय स्थानिक प्रशासन यंत्रणेस निर्देश दिले आहेत. त्यानुसार पोलिस/तपास यंत्रणेस पंच उपलब्ध करुन देण्याबाबत व्यापक तसेच सकारात्मक दृष्टीकोन बाळगणे अवश्यक आहे.

सबब, लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये दाखल होणारे गुन्ह्यातील तपासाकामी तसेच स्थानिक पोलिस यंत्रणांमार्फत नोंदविण्यात येणा-या गुन्ह्यांतील तपासाकामी पोलिस यंत्रणेकडून गोपनीय कामकाजासाठी संबंधीत महापालिका विभागाकडे/कार्यालयाकडे पंचांची लेखी स्वरुपात मागणी केलेनंतर संबंधित विभागाचे आस्थापनेवरील किमान गट-क संवर्गातील कर्मचारी तात्काळ उपलब्ध करुन देण्याकामी महानगरपालिकेच्या सर्व विभागप्रमुखांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

उपरोक्त आदेशाचा अंमल तात्काळ लागू होईल.

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति,

१. सर्व संबंधित विभागप्रमुख/विभाग

२. जनसंपर्क विभाग

२/-अणुविद्युत व दुरसंचार विभागाशी समन्वय साधून स्थानिक पोलिस प्रशासनास विभागप्रमुख/विभागांचे दुरध्वनी/भ्रमणध्वनीची यादी उपलब्ध करुन द्यावी. तसेच महापालिकेच्या संकेतस्थळांवरही विभागप्रमुख/विभागांचे दुरध्वनी/भ्रमणध्वनी यादी प्रसिध्द/वेळोवेळी अद्ययावत करण्यात यावे.

३. सर्व संबंधित पोलिस कार्यालय

संबंधित पोलिस कार्यालय/पोलिस स्टेशन ज्या क्षेत्रीय कार्यालयाचे कार्याक्षेत्रामध्ये येते त्या क्षेत्रीय कार्यालयाकडे/विभागाकडे पंच उपलब्ध करुन देण्याकामी लेखी मागणी करण्यात यावी.